CMYK

विष्णुसहस्त्रनाम प्रवचनमालेची सांगता संजय रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरण >>पान 2

अफवामुळे नंदुरबारमध्ये पोलिसांवर दगडफेक, संशयित १८ जण ताब्यात >>पान 3

हरदडा फाटा येथील हायमास्ट दिवा बनला शोभेची वस्तू; बंद असल्यामुळे होत आहे अपघाताला कारणीभूत! >>पान 4

**सुविचार**

मुल्यांनुसार वागणे म्हणजेच जीवनाचा खरा आदर्श दाखवणे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



सैफ हल्ला प्रकरण: सैफची सदनिका, इमारतीतून आरोपीचे १९ फिंगरप्रींट सापडले आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 160 ■ मंगळवार, दि. 21 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## शेगांव तालुक्यातील अवसायनातील आठ संस्थांची नोंदणी रद्द होणार; आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेगांव तालुक्यातील आठ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे शेगांव सहकारी संस्थाचे सहायक निबंधक विशाल दाते यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर आठ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

## बुलढाण्यातील मलकापूर शहरात गॅरेजला लागलेल्या आगीत अनेक गाड्या जळून खाक, लाखोंचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरातील सानिया कार गॅरेजमध्ये भीषण आग लागली. या आगीत दुरुस्तीसाठी आलेल्या १० ते १२ चारचाकी वाहनांसह सुमारे १० ते १५ लाखांचे स्पेअर पार्ट्स जळून खाक झाले आहेत. आज सकाळच्या सुमारास ही भीषण आग लागली. मलकापूर बुलढाणा रोडवरील सानिया कार येथील गॅरेजमध्ये उभी असलेल्या स्विफ्ट डिझायर कंपनीच्या गाडीला अचानक मोठ्या प्रमाणात आग लागली त्या आगीने आजूबाजूच्या गाड्यांनाही आपल्या विळख्यात घेतले. गॅरेजमध्ये असलेले लाखोंचे स्पेअर पार्ट् ही या आगीत जळाले आहेत. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. मात्र, आग इतकी भयंकर होती की ती विझवण्यासाठी तीन तास शर्तीचे प्रयत्न करावे लागले. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमक विभागाला यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, गॅरेजमधील वाहनांसह स्पेअर पार्ट्स जळाल्यामुळे प्रचंड लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

## ज्योतिबाचे दर्शन २४ जानेवारीपर्यंत बंद रहाणार

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या दख्खनचा राजा श्री ज्योतिबाच्या मूर्तीवर रासायनिक संवर्धन प्रक्रिया केली जाणार असल्याने भाविकांना श्री ज्योतिबा देवस्थानाचे दर्शन घेता येणार नाही.मिळालेल्या माहितीनुसार पुरातत्व विभागाच्या तज्ज्ञांकडून उद्या ( दि २१ ) पासून रासायनिक प्रक्रिया केली जाणार आहे. हे काम २४ जानेवारीपर्यंत चालू राहणार असल्याने या कालावधीत मूर्तीचे दर्शन भाविकांना मिळणार नाही.

मौजे वाडी रत्नागिरी येथील श्री केदारलिंग देवस्थान मूर्ती सुस्थितीत राहण्यासाठी सहाय्यक संचालक,पुरातत्व विभाग,पुणे यांच्यावतीने श्री केदारलिंग देवाच्या मूर्तीवर रासायनिक संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे. देवस्थान व्यवस्थापन समितीने ३ जानेवारी रोजी भारतीय पुरातत्व विभागाच्या महासंचालकांना मूर्तीच्या संवर्धनासाठी पत्र लिहिले होते. भारतीय पुरातत्व विभागाने मूर्तीची पाहणी करून त्यावर रासायनिक प्रक्रिया करायचे ठरवले असल्याने मंगळवार ( दि. २१ ) ते शुक्रवार दि .२४ ) पर्यत भाविकांना ज्योतिबा देवस्थानाचे दर्शन घेता येणार नाही. दरम्यान भाविकांना फक्त उत्सव मूर्ती आणि कळसाचे दर्शन खुले ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने दिली आहे.

# बदलापूर बलात्कारातील आरोपी अक्षय शिंदेंचा एन्काऊंटर फेक



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :बदलापूर येथील शाळेतील दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदे याच्या पोलीस एन्काऊंटरबाबत एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. अक्षय शिंदे याचा मृत्यू बनावट चकमकीत झाल्याचा अहवाल सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी या अहवालाचे न्यायालयात वाचन केले. यामध्ये अनेक धक्कादायक गोष्टींचा उल्लेख आहे.**

## चौकशी समितीचा ५ पोलिसांवर ठपका!

अक्षय शिंदे याला बदलापूरच्या दिशेने नेत असताना त्याने मुंब्रा बायपासनजीक गाडीतच पोलिसांची रिव्हॉल्व्हर हिसकावून घेतली. याम धून त्याने पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांन स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात अक्षयचा मृत्यू झाला, असा दावा पोलिसांकडून करण्यात आला होता. मात्र, चौकशी अहवालात अक्षय शिंदे याला बनावट चकमकीत मारण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. या बनावट चकमकीतील पाच पोलीस कर्मचाऱ्यांनी आपल्या बळाचा गैरपद्धतीने वापर केला. त्यामुळे हे पाच पोलीस कर्मचारी अक्षय शिंदे याच्या मृत्यूसाठी जबाबदार आहेत, असे संबंधित अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या अहवालात म्हटल्याप्रमाणे, अक्षय शिंदे याच्या हाताचे ठसे रिव्हॉल्व्हरवर आढळून आलेले नाही. मात्र, पोलिसांनी अक्षयने त्यांच्याकडील रिव्हॉल्व्हर हिसकावून गोळीबार केल्याचा दावा केला होता. मात्र, या अहवालामुळे पोलिसांचे पितळ उघडे पडले आहे. पोलिसांचा आत्मसंरक्षणासाठी आम्ही अक्षयवर गोळीबार केला हा दावा संशयास्पद असल्याचे अहवालात म्हटले आहे. अक्षय शिंदे याचा चकमकीत मृत्यू झाल्यानंतर घटनास्थळावरुन जमा केलेली सामुग्री आणि एफएसएल रिपोर्टनुसार, अक्षय शिंदे याच्या आई-वडिलांनी केलेले आरोप योग्य आहेत. अक्षय शिंदे याच्या मृत्यूसाठी पाच पोलीस कर्मचारी जबाबदार आहेत, असेही या अहवालात म्हटले आहे.

नेमकं काय घडलेलं?

बदलापूरमधील शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा २३ सप्टेंबर रोजी एन्काऊंटर करण्यात आला होता. तळोजा कारागृहातून रिमांडसाठी नेत असताना घटना घडली होती. मुंब्रा बायपास जवळून जात असताना आरोपी अक्षय शिंदे याने एपीआय निलेश मोरे यांची सर्व्हिस रिव्हॉल्व्हर खेचली. यानंतर निलेश मोरे यांच्यावर त्याने ३ गोळ्या फायर केल्या. यातील एक गोळी निलेश मोरेंच्या पायाला लागली आणि २ गोळ्यांचा फायर चुकली. सोबत असलेले दुसरे अधिकारी, पोलीस निरीक्षक यांनी स्वसंरक्षणासाठी गोळीबार केल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला होता. रिव्हॉल्व्हरमधून झाडलेल्या २ गोळ्या अक्षय शिंदेवर फायर केल्या. यातील एक अक्षय शिंदेच्या डोक्याला, तर दुसरी शरिरावर लागली होती.

## भाजप-शिवसेनेच्या वादात राष्ट्रवादीची उडी; नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत माणिकराव कोकाटेंचे मोठे वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून शनिवारी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र, एकाच दिवसात नाशिक आणि रायगड जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची वेळ राज्य सरकारवर आली. नाशिकच्या पालकमंत्रिपदावर भाजपाचे गिरीश महाजन आणि रायगडच्या पालकमंत्रीपदावर राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली होती. यामुळे नाशिकम धून दादा भुसे आणि रायगडमधून भरत गोगावले समर्थक कमालीचे नाराज झाल्याचे दिसून आले. यानंतर रविवारी रात्री उशिरा नाशिकच्या पालकमंत्रीपदी गिरीश महाजन आणि रायगडच्या पालकमंत्रीपदी आदिती तटकरे यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात येत असल्याचे आदेश काढण्यात आले. नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीतील वाद चव्हाट्यावर आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच आता राज्याचे कृषिमंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या वक्तव्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

माणिकराव कोकाटे म्हणाले की, पालकमंत्रिपदाची नेमणूक करणे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या अधिपत्याखाली असते. मी वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी फिरतो आहे. नाशिकच्या पालकमंत्रिपदाची आमची मागणी तर आहेच, ती पूर्वी देखील होती आणि आजही आहे. नाशिकमध्ये आमचे ७ आम दार आहेत. आमचे आमदार जास्त म्हणून आमची या पालकमंत्रिपदासाठी मागणी आहे. माझ्याबाबत माझा पक्ष निर्णय घेईल.

## २१०० रुपयांची वाट पाहणाऱ्या 'त्या' लाडक्या बहिणींकडून १५०० रुपये वसूल होणार? कोणत्या बहिणींना पैसे परत करावे लागणार?

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सराकरने जुलै २०२४ मध्ये सुरु केली होती. लाडक्या बहिणींना जुलै ते डिसेंबर या कालावधीत ६ म हिन्यांच्या कालावधीची रक्कम देण्यात आली आहे. राज्यातील लाडक्या बहिणींना आतापर्यंत सहा हप्त्यांमध्ये ९ हजार रुपये मिळाले आहेत. राज्य सरकारला या योजनेमुळं विधानसभा निवडणुकीत यश मिळाल्याचे पाहायला मिळाले होते. महायुतीने निवडणूक प्रचाराच्या काळात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासने दिले होते.नवे सरकार स्थापन झाल्यानंतर पहिला हप्ता १५०० रुपये दिले गेले, २१०० रुपयांसाठी अर्थकसंकल्पाचा शब्द देण्यात आला आहे. या दरम्यानच अपात्र लाभार्थी महिलांकडून त्यांना देण्यात आलेली रक्कम परत स्वीकारली जाणार आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या निकषांमुळं अपात्र ठरणाऱ्या महिलांना २१०० रुपये तर मिळणारचे नाहीत तर १५०० रुपये देखील परत द्यावे लागतील असे चित्र आहे.

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिवेशनावेळी अदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत माहिती दिली. बहिणींनी दोन वेळा किंवा तीन वेळा अर्ज दाखल केले होते. काही म हिलांचे उत्पन्न जास्त झाले असेल. चार चाकी वाहने असतील त्यांनी लाभ परत देण्यास सुरुवात केलेली आहे. डिसेंबरमध्ये रक्कम प्राप्त झालेली आहे, जानेवारीत देखील लाभ जमा होत आहे. सरकारी चलानच्या माध्यमातून ती प्रक्रिया करुन घेत आहोत. लाडक्या बहिणींचे आभार मानेन की ज्यावेळी लक्षात आलं की आपल्याला दोन वेळा लाभ आलेला आहे, आपण या योजनेस पात्र नाही, त्यावेळेला स्वत: पुढं येऊन राज्य शासनाचा निधी पात्र असण्याच्या पलीकडील परत करण्याची भूमिका महाराष्ट्राच्या बहिणींनी घेतली आहे. बहिणी लाडक्या आहेत आणि प्रामाणिक आहेत हे पाहायला मिळालं, असं अदिती तटकरे म्हणाल्या. आम्ही जे क्रॉस व्हेरिफिकेशन परिवहन, इन्कम टॅक्स विभागाकडून सुरु केलं आहे. ही सातत्यानं प्रक्रिया सुरु आहे. सरकारी चलनच्या माध्यमातून अर्थ व नियोजन विभागासोबत चर्चा सुरु आहे, स्वतंत्र हेड तयार करुन घेत आहोत, त्या पद्धतीनं हे पैसे शासनाच्या तिजोरीत येणार असल्याचं अदिती तटकरे म्हणाल्या. अडीच कोटी लाभार्थ्यांची पडताळणी पूर्णपणे करणार नाही, असंही त्या म्हणाल्या होत्या.

ज्या महिलांच्यां कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा असेल त्या या महिला या योजनेसाठी अपात्र असतील. नोकरदार महिला, आयकर भरतात, चारचाकी वाहन ज्यांच्या नावावर असेल त्या महिलांना योजनेचे रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत परत करावी लागेल, अशी शक्यता आहे. राज्य शासनाच्या इतर आर्थिक योजनांचा लाभ घेणाऱ्या म हिलांना देखील रक्कम परत करावी लागू शकते.

## केंद्र सरकारच्या जमिनीवरील एक लाख ४१ हजार झोपड्यांचे २०३० पर्यत पुनर्वसन

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी पुनर्वसन योजना राबविल्या जात आहे. मात्र अजूनही मोठ्या संख्येने झोपड्यांचे पुनर्वसन शिल्लक आहे. त्यातही केंद्र सरकारच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी कोणतेही ठोस धोरण अद्याप नाही. त्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन करण्यासाठी केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडून ना हरकत प्रम ाणपत्र घ्यावे लागते. ते प्रमाणपत्र मिळत नसल्याने मुंबईतील मोठ्या संख्येने झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडल्या आहेत. मात्र आता या झोपड्यांचे पुनर्वसन मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र सरकारच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी सुलभ आणि जलद ना हरकत प्रमाणपत्र मिळावे, यासाठी नवीन धोरण आणले जाणार आहे. केंद्र सरकारच्या २७१.७६ हेक्टर जागेवर विस्तारलेल्या एक लाख ४१ हजार ५४४ झोपड्यांचे पुनर्वसन येत्या सहा वर्षात अर्थात २०३० पर्यत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे आहे.

झोपु प्राधिकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत अडीच लाखांहून अधिक झोपड्यांचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे, तर ११ लाखांहून अधिक झोपड्यांचे पुनर्वसन बाकी आहे. त्यातही केंद्र सरकारच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर आहे. कारण त्या जागेवरील झोपु योजनांसाठी राज्य सरकारला केंद्र सरकारकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. केंद्र सरकारच्या संबंधित विभागांकडून हे प्रमाणपत्र मिळत नसल्याने सध्या केंद्र सरकारच्या जागेवरील एक लाख ४१ हजार ५४४ झोपड्यांचे पुनर्वसन रखडले आहे. विमानतळ, संरक्षण विभाग, मुंबई बंदर प्राधिकरण, मि ठागरे, रेल्वे यासह अन्य विभागाच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने पुनर्वसन होत नसल्याचे चित्र आहे. विमानतळालगतच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी कित्येक वर्षापासून राज्य सरकार, झोपु प्राधिकरण प्रयत्नशील आहे. मात्र ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने झोपु योजना रखडली आहे. ही अडचण लक्षात घेत आता केंद्र सरकारच्या जागेवरील झोपु योजनांसाठी नवीन धोरण तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आल्याची माहिती झोपु प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

देशाच्या आर्थिक विकास वाढीच्या अनुषंगाने निती आयोगाच्या शिफारशीनुसार देशातील चार म हानगरांचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून विकास केला जाणार आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश ग्रोथ हबअंतर्गत केंद्र सरकारच्या जागेवरील एक लाख ४१ हजार ५४४ झोपड्यांच्या पुनर्वसनाचे उद्दीष्ट झोपु प्राधिकरणाने ठेवले आहे. केंद्र सरकारच्या २७१.७६ हेक्टर जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी जलद आणि सुलभरित्या ना हरकत प्रमाणपत्र मिळावे, यादृष्टीने झोपु प्राधिकरणाच्या माध्यमातून धोरण प्रस्तावित करण्यात आले आहे. लवकरच हे धोरण तयार करण्यात येणार आहे. त्या धोरणाअंतर्गत २७१.७६ हेक्टर जागेवरील झोपु योजना मार्गी लागतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे. २०३० पर्यत एक लाख ४१ हजार ५४४ झोपड्यांचा कायापालट करण्याचे उद्दीष्ट असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# राज्य शासनाला त्यांच्याच जाहीरनाम्याचा पडला विसर

**अद्याप कर्जमाफी ही नाही पिक विमा नुकसान भरपाई सुद्धा नाही**

**२०२३-२०२४ ची पिक विम्याची नुकसानभरपाई केव्हा भेटणार शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी**

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** निवडणुका अगोदर राज्य शासनाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी व पीक विमा नुकसान भरपाई चे थकबाकी असलेले २०२३ चे खरीप व रब्बी चे पैसे तात्काळ देऊ असे जाहीरनाम्यात सांगितले होते परंतु सत्ता येतात आपल्या आश्र्वासनाचा जणू काही त्यांना विसर पडलाय असे दिसत आहे लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळात २०२३ व २०२४ साली खरीप हंगामातील सोयाबीन पिकाचे अवेळी पावसाने खूप नुकसान झाले होते त्या नुकसानीचे पिक विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी ठिकाणावर येऊन पंचनामे सुद्धा केले होते तरी अद्यापही २०२३ च्या खरीप हंगामाची पिक विमा नुकसान भरपाई अद्यापही मिळाली नाही तसेच २०२३ २४ च्या रब्बी हंगामातील हरभरा पिकाची सुद्धा अवेळी पावसाने खूप सारी नुकसान झाले होते त्याचे सुद्धा अंजनी खुर्द महसूल मंडळातील तसेच परिसरातील बऱ्याच गावातील बऱ्याच गावांची हरभरा पिकाचे नुकसान झाले होते त्यातही सुद्धा शेतकऱ्यांचे शेतात येऊन पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पंचनामे सुद्धा केले होते ते सुद्धा पैसे अद्याप कुठल्या शेतकऱ्यांना मिळाले नाही विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शासनाने शेतकऱ्यांना आमचे सत्ता आल्यास आम्ही तात्काळ शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाई



व कर्जमाफी देऊ असे आपल्या जाहीरनाम्यात सांगितले होते अद्याप तरी राज्य शासनाच्या कर्जमाफी विषयी कुठलेही हालचाली दिसत नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये राज्य शासनाविषयी कुठेतरी असंतोष दिसत आहे त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्याचे थांबलेले पिक विमा नुकसान भरपाई तात्काळ द्यावी अशी मागणी परिसरातील शेतकरी बांधव करीत आहे

CMYK

## हळदी कुंकू कार्यक्रमाचे राजकीयकरण

महिलांचा हळदी कुंकू समारंभ हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. विशेषतः मकर संक्रांतीनंतर हळदी कुंकू समारंभ मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. या निमित्ताने महिला आपले दुःख विसरून एकत्र येतात. वान म्हणून एकमेकांना भेटवस्तू देतात. या निमित्ताने विविध सामाजिक संदेश दिला जातो. पण हल्ली हळदी कुंकू समारंभ देखील इतर सणांप्रमाणेच इव्हेंट बनला आहे. अलीकडे तर या सार्वजनिक हळदी कुंकू समारंभाचे पेवच फुटले आहे. विशेषतः यातले ९० टक्के हळदी कुंकू समारंभ हे राजकीय स्वरुपाचे किंवा त्या हेतूने प्रेरित असल्याचे दिसून येते. ज्या शहरात किंवा गावात निवडणुका असतात तिथे तर हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. स्थानिक नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य असे कार्यक्रम करण्यात अग्रेसर असतात. यावर्षी ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका आहेत त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात हळदी कुंकू समारंभ आयोजित केले जात आहेत. या निमित्ताने उपस्थित महिलांना भेटवस्तूंचे वाटप राजकिय नेते करत आहेत. हळदी कुंकू समारंभ हे एकप्रकारे राजकीय शक्ती प्रदर्शनाचे आणि प्रचाराचे माध्यम बनत आहे. राजकीय नेत्यांनी आयोजित केलेले हळदी कुंकू समारंभ हे महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी आयोजित केले जातात. एरव्ही या महिलांना कोणी विचारतही नाही. आज ज्याप्रमाणे राजकीय नेत्यांनी दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव यासारख्या सार्वजनिक उत्सवात अतिक्रमण करून या उत्सवांचा इव्हेंट बनवला आहे. त्याचीच पुनरावृत्ती हळदी कुंकू समारंभात होताना दिसत आहे. निखळ, कौटुंबिक आणि सांस्कृतिक स्वरूपातील या कार्यक्रमाचा नवरात्र, गणेशोत्सव व नवरात्र उत्सव यासारखा राजकीय आणि बाजारू वापर केला जात आहे. राजकीय नेते यातून आपला राजकीय मतलब साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय नेत्यांनी महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी हळदी कुंकू समारंभाचा वापर करण्याऐवजी महिलांचे प्रश्न सोडवावेत म्हणजे राजकीय नेत्यांना अशा सार्वजनिक कार्यक्रमाचा वापर करण्याची गरज पडणार नाही आणि हळदी कुंकू सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अवमूल्यन देखील होणार नाही.

# विष्णुसहस्त्रनाम प्रवचनमालेची सांगता संजय रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** भगवान विष्णुस्वरूप पारिजात वृक्षास आलेली सुगंधी फुले भक्तराज भीष्मांनी वेचली, विशालबुध्दी व्यासांनी ती गुंफली, भाष्यकारांनी शोभविली व हा वीर्यशौर्यधैर्य वर्धक हार विष्णू सहस्त्रनाम भाविकांना कंठात घालण्यासाठी सादर केला, असे विचार भगवताचार्य महाराज यांनी व्यक्त केले. आज विष्णू सहस्त्रनाम सोहळ्याचा समारोप झाला .माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरण करण्यात आले.

कधीही न सुकणाऱ्या पुष्पांची प्रभा दिवसेंदिवस फाकतच जाते. मानवाची ओढ दुःखमुक्ती आणि आनंदप्राप्तीसाठी आहे. हे साध्य करण्यासाठीचे एक प्रभावी साधन विष्णुसहस्त्र नाम आहे. ही नाममाला जीवाला समत्वाची श्रीमंती देऊन आत्मऐश्र्वर्याने युक्त करून भगवंतस्वरूप करते आणि नारायणाला आपल्या जीवनाशी जोडून भवरोग सारते. ही केवळ नामे नसून दिव्य जीवनसुत्रे आहेत,असेही






विश्र्वास महाराज यांनी प्रतिपादन केले. वेदअक्षरांनी पाया भरून वर आणलेले हे साहित्यमंदीर उपनिषद गर्भगृहाने नटलेले आहे, वर गीतेचा घुमट साजत असून त्यावर आकाराने लहान पण ज्ञानतेजाने महान असा विष्णुसहस्त्रनामाचा कळस शोभत आहे. माऊली ज्ञानोबाराय, जगद्गुरू तुकोबाराय, शांतीब्रह्म एकनाथादि संतांची प्रमाणे देऊन भागवताचार्य विश्र्वास महाराजांच्या मुखारविंदातून प्रत्येक नामाविषयी हृदयपरिवर्तनक्षम असे कल्याणकारी मार्गदर्शन लाभून मेहकर येथील भाविक प्रसन्न व तृप्त झाले.

भक्तांना कसलीही असुविधा होऊ नये यास्तव मोहन ठोसर, सौ. लालिता ठोसर, हर्षल सोमण, सौ. सलोनी सोमण, पुरुषोत्तम शीलवंत हे समर्पण भावाने सेवारत होते. या विष्णुनाम प्रवचनाचे महत्व प्रतिपादित करून भाविकांना श्रवणाचे आवाहन करणारी 'नामाच्या या महिम्यामधुनी ज्ञानाचे हे बोध घेऊनी । भक्त ऐकती दंग होऊनी, डोलती आनंदे मनोमना' ही रचना संगीत विशारद सौ. सलोनी सोमण यांनी रचून संगीतबध्द करून सादर केली. कु. अंकिता किशोर कुळकर्णी या चिमुकलीने संपूर्ण रामायणाचा सुंदर देखावा सादर करून सर्वांनी मने जिंकली. यावेळी बोलताना संजय रायमुलकर यांनी सांगितले की धर्म संस्कृती या माध्यमातून सद विचाराचे प्रबोधन आणि पुढच्या पिढीकडे संक्रमण होत असते. सकल मानव समाजाच्या उत्कर्षासाठी व माणुसकीभाव वाढीस लागण्यासाठी हे आवश्यक असते. वारकरी संप्रदायाचा आपल्याला अमोल वारसा लाभलेला असून त्याचे जतन करण्यासाठी सर्वांनी परिश्रम करावे.

समारोपीय कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वितरण संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज किंबहुणे यांनी केले.

# महसूल विभागाने शंभर दिवसांसाठीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा – महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल विभाग हा सामान्य माणसाच्या प्रत्येक कामाशी निगडीत विभाग आहे. महसूल विभागाची सर्वसमावेशक कामे, सुविधा, योजनांच्या परिणामकारक अंमलबजाणीमुळे जनसामान्यात शासनाची प्रतिमा उंचावली जाते. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागात राबविण्यात येत असलेला शंभर दिवसांसाठीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जनसामान्यांना शासनाच्या सेवा अधिक जलद गतीने उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

महसूल विभाग अंतर्गत शंभर दिवसांत घेण्यात येत असलेले कार्यक्रम, योजनांचा आढावा महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी घेतला. मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या बैठकीस अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, उपसचिव अजित देशमुख, धनंजय निकम, सत्यनारायण बजाज आदी उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, नागरिकांना महसूल विभागाच्या जास्तीत जास्त सेवा पश्रळपश देण्यासाठी पोर्टलचा अधिकाधिक वापर करावा. यामध्ये जमीन पोर्टल, महाखनिज पोर्टल, आपली चावडी, ई चावडी यासारख्या प्रणालींचा वापर करावा.

महसूल विभागाचे निर्णय तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याबरोबरच कार्यशाळा आयोजित कराव्यात. नोंदणी व मुद्रांक विभागातील कार्यालयांमध्ये सुविधा निर्माण कराव्यात. क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात नियमित भेटी देऊन योजना, उपक्रमांचा आढावा घ्यावा, अशा सूचना महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिल्या.

## लव्ह मॅरेजचा सूड ५ वर्षांनी उगवला , सासरच्या मंडळींनी जावयाला कोयता आणि चॉपरने वार करून संपवले, जळगाव हादरले

**जळगाव/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात गुन्हेगारीने डोके वर काढले असून दिवसाढवळ्या हत्या, खून, लैंगिक अत्याचार, किरकोळ कारणातून कोयता, तलवारीने मारहाण, गुंडगिरी अशी कित्येक प्रकरणं दररोज समोर येत आहेत . दरम्यान ५ वर्षापूर्वी केलेल्या प्रेमविवाहाचा राग मनात ठेवून सासरच्या मंडळींनी कोयता आणि चोपरने वार करत जावयाला ठार केल्याची घटना रविवारी जळगाव शहरातील पिंप्राळा हुडको परिसरात घडली आहे .मुलीकडच्यांनी केवळ जावयालाच संपवलं नाही तर वार करताना मध्ये पडलेल्या जावयाच्या कुटुंबातील ७ जणांवरही वार करत जखमी केलं आहे. प्रेम विवाहतून झालेल्या या हत्याकांडानंतर संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. परिसरात तणाव आहे. घटनेची माहिती मिळताच जळगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांनी रामानंदनगर पोलीस ठाण्यात तरुणीच्या भावासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला. यातील ६ जणांना अटक करण्यात आली आहे.

या घटनेत मुकेश रमेश शिरसाठ या प्रेमविवाहित तरुणाची हत्या झाली आहे. तर त्याच्या कुटुंबातील ७ जण जखमी झालेत. या घटनेत जळगावात सैराट चित्रपटाची पुनरावृत्ती झाल्याची चर्चा आहे. या घटनेने परिसरात तणावाचे वातावरण असून प्रेमविवाहाचा बदलातून झालेल्या हत्याकांडाने खळबळ मजली आहे. परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावलाय. घटनेचा तपास सुरू आहे. मुकेश रमेश शिरसाठ याने पाच वर्षापूर्वी जळगाव शहरातील पिंपराळा हुडको परिसरात पूजा नामक तरुणीशी पळून जाऊन प्रेमविवाह केला. तेव्हापासून शिरसाट कुटुंबीय आणि तरुणीच्या माहेरील मंडळींमध्ये वाद सुरू होते. रविवारी सकाळी मुकेश दुकानावर जाण्यासाठी घराबाहेर आला. त्यावेळी मुलीच्या माहेरच्या मंडळींनी कोयता आणि चोपरने मुकेशच्या मानेवर वार केला. यात गंभीर दुखापत झाल्याने मुकेशचा जागीच मृत्यू झाला. मुकेशवर वार होत असताना त्याला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या मुकेशचा भाऊ, काका, काकू, दोन चुलत भाऊ, चुलत बहीण यांच्यावरही मुलीच्या माहेरच्यांनी वार केले असून यात कुटुंबातील ७ जण जखमी झाले आहेत. बायकोच्या माहेरच्या कुटुंबीयांनी पाच वर्षांनी प्रेमविवाहाचा सूड घेत जावयाची निघृण हत्या केली. मुकेशच्या पश्चात आई–वडील भाऊ पत्नी व मुलगी आहे.

या हत्याकांडाने जळगाव सुन्न झाले असून परिसरात प्रचंड तणाव आहे. डोळ्यांदेखत झालेल्या मुकेशच्या हत्येनंतर रुग्णालया बाहेरही मोठी गर्दी आहे. या घटनेने संपूर्ण गाव हादरले आहे. मुकेशच्या कुटुंबीयांनी टाहो फोडला.या घटनेच्या तीव्रतेने परिसरात तणाव निर्माण झाला असून पिंपराळा हुडको परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला आहे .प्रेमविवाह केल्याने मुलीच्या घरच्यांचे आपल्या पुतण्या सोबत वैर निर्माण झाले होते .विवाह झाल्यापासून ते त्याचा बदला घेण्यासाठी संधीची वाट पाहत होते . रविवारी त्यांना मुकेश एकटा सापडला . लाठी काठी कोयता चॉपर मिळेल त्या शस्त्राने वार करत मुलीच्या कुटुंबीयांनी मुकेश ला ठार केले असल्याचे निळकंठ शिरसाट (मुकेशचे काका) यांनी म्हटल आहे.

## सैफ हल्ला प्रकरण: सैफची सदनिका, इमारतीतून आरोपीचे १९ फिंगरप्रींट सापडले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ अली खानवर हल्ला केल्याप्रकरणी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद ऊर्फ विजय दास (३०) याला अटक केल्यानंतर आरोपीचे घटनास्थळावरून आरोपीच्या बोटांचे ठसे १९ ठिकाणी सापडले आहेत. जिना, खिडकी, सदनिका अशा विविध ठिकाणी हे ठसे सापडले असून आरोपीविरोधात हा भक्कम पुरावा ठरू शकतो. आरोपी ठाण्यात झुडपांमध्ये लपून बसला होता. तेथून त्याला ताब्यात घेऊन पुढे अटक करण्यात आली.

हल्ल्याच्या दिवशी आरोपी इमारतीत असलेल्या जिन्यावरून चढून आला व सैफचा धाकटा मुलगा जहांगीर याच्या खोलीतील शौचालयाच्या खिडकीतून घरात शिरला. त्यावेळी घरात शिरलेल्या अनोळखी व्यक्तीला पाहून सैफ अली खानच्या घरात काम करणारी महिला नर्स एरियामा फिलिप्स ऊर्फ लिमा या सैफचा मुलगा जहांगीर याला उचण्यासाठी धावल्या असता आरोपीने त्यांच्यावर हेक्सा ब्लेडसारख्या वस्तूने हल्ला केला. त्यावेळी सैफ अली खान व करीना दोघेही तेथे पोहोचले. त्यावेळी हल्लेखोराने हेक्सा ब्लेडसारख्या हत्याराने सैफवर हल्ला केला. तैमुरची आया लिमा यादेखील मध्ये पडल्या. आरोपींच्या हल्ल्यात त्याही जखमी झाल्या आहेत. ही घटना मध्यरात्री अडीच्या सुमारास घडली. सैफ यांच्यावर लीलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याची प्रकृती स्थीर आहे.

हल्यावेळी सैफच्या घरात पत्नी करीना कपूर, दोन मुलगे व तीन महिला कर्मचारी असे सात जण होते. सैफ अली खानचा मुलगा जहांगीरच्या खोलीत चोरटा शिरला. त्या खोलीत दोन महिला कर्मचारी झोपल्या होत्या. यातील एका महिला कर्मचाऱ्याला त्याने आधी शांत राहण्यास सांगून धमकावले. तसेच १ कोटी रुपये मागितले. त्यावेळी लिमा या सैफच्या लहान मुलाला घेण्यासाठी गेल्या असता आरोपीने त्यांच्यावर हल्ला केला. पण या सर्व झटापटीमध्ये आरोपीचे सैफच्या घरी १९ ठिकाणी उमटलेले बोटांचे ठसे तज्ज्ञांना सापडले आहेत. अंगुलीमुद्रा व न्यायवैद्यक तज्ज्ञांच्या मदतीने महत्त्वाचे पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

# स्काऊट – गाईड जिल्हा मेळाव्यामध्ये दोन्हीही विभागात श्री शिवाजी हायस्कूल, डोणगांव प्रथम

## श्री शिवाजी हायस्कूलचे होत आहे सर्वत्र कौतुक

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** दि.१५ जानेवारी ते १७ जानेवारी या दरम्यान मेहकर तालुक्यातील घाटबोरी येथे जिल्हा स्काऊट गाईड संस्थेच्या वतीने स्काऊट गाईड जिल्हा मेळावा आयोजीत केला होता. मेळाव्यात जिल्हयातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. या मेळाला दरम्यान तंबु निरीक्षण, लोकनृत्य, पथसंचालन.शारीरिक प्रात्याक्षिके शेकोटी कार्यक्रम शोभायात्रा अशा विविध स्पर्धा आयोजीत केल्या होत्या. या मेळाव्यामध्ये श्री शिवाजी हायस्कूल, डोणगांव चे २२ स्काऊट व २३ गाईड सहभागी झाले.

सर्व स्पर्धेमध्ये श्री शिवाजी हायस्कूल, डोणगांव च्या स्काऊट गाईड मध्ये विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत दोन्हीही विभागातून जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला त्यानिमित्याने संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे, प्राचार्य







रविंद्र आखाडे, उपप्राचार्य संजय बाजड पर्यवेक्षक एस. जी. चव्हाण पालक म्हणून यांनी विजेत्या टिमचे अभिनंदन केले. व त्यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे वारकरी सर, चोंडकर सर कोडापे सर डुकरे सर, झगडे मॅडम यांचाही साकार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र माने सर यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### भिवंडी-वाडा रस्त्याची दुरावस्था, रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याने नागरिक त्रस्त



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी-वाडा या खाजगीकरणातून विकसित केलेल्या ६४ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या नादुरुस्त झालेल्या रस्त्याने प्रवास करणारे प्रवासी, चाकरमानी व विद्यार्थी हैराण झाले आहेत. शिंदे गटाचे भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत या रस्त्याची पाहणी केली होती. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरीत या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, ज्या ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणचे कामी त्वरित पूर्ण करावी अशा सूचना आमदार शांताराम मोरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी प्रत्येक वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोट्यावधी रुपये खर्च करून सुद्धा या रस्त्यावरील खड्डे जैसे थे राहिल्याने येथील नागरिक संतप्त झाले आहेत.

### मुंबई हादरली! आलिशान हॉटेलमध्ये आढळला ६० वर्षीय महिलेचा मृतदेह

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मुंबईतल्या एका नामांकित हॉटेलमध्ये एका ६० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळला आहे. या घटनेने आजुबाच्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई हे शहर गजबजलेल्या शहरांपैकी एक आहे. फिरण्याच्या तसेच उदरनिर्वाह करण्याच्या उद्देशाने अनेक लोक मुंबईत येतात. मुंबईत राहण्यासाठी हजारो नामांकित हॉटेल गरजूंसाठी उपलब्ध असतात. अशाच एका नामांकित हॉटेलच्या रूम मध्ये विसावलेल्या ६० वर्षीय महिलेचा मृतदेह सापडला आहे. मुंबईतील हॉटेल ट्रायडंट मध्ये हा मृतदेह सापडला असून मृत महिलेचं नावं विनती मेहतानी असल्याचं समजत आहे. ही महिला २७ व्या मजल्यावरील या रूम मध्ये ६ जानेवारीपासून एकटीच राहत होती. रूम क्लिनिंग साठी गेलेल्या कर्मचाऱ्याला प्रतिसाद न दिल्याने कर्मचाऱ्याला संशय आला. त्याने मास्टर किने दरवाजा उघडून बघताच आतमध्ये महिलेचा मृतदेह आढळला आहे. रविवारी संध्याकाळी ही घटना घडली असून या महिलेचा मृत्यू नैसर्गिक झाला की तिने स्वत: आत्महत्या केली आहे याबाबत मुंबई पोलीस अधिक तपास करत आहेत.

### जिल्ह्यात बीडची लॉबी काम करतेय, मंत्री नितेश राणे संतापले; पत्रकार परिषदेतून थेट इशारा, गाठ माझ्याशी

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे सध्या बीड जिल्हा चांगलाच चर्चेत आला आहे. त्यातच, येथील खंडणी प्रकरणाली आरोप वाल्मिक कराड हेच बीडले शाडो पालकमंत्री असून बीडमधील अधिकाऱ्यांची बदली, पोलीस दलातील अधिकाऱ्यांवर वचक ठेवण्याचं काम त्यांच्याकडून होत असल्याचा आरोप गेल्या



काही दिवसांत झाल्याचं पाहायला मिळाला. त्यातच, राज्याचे मस्यव्यवसाय आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांना पालकमंत्री पद मिळाल्यानंतर पहिल्यांदाच सिंधुदुर्ग जिल्ह्यात भेट दिली. मंत्री राणेंनी येथे पत्रकार परिषद घेत अधिकाऱ्यांना राणे स्टाईलने इशारा दिला. सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनामध्ये बीडची लॉबी काम करत असल्याची माहिती माझ्याजवळ असल्याचं त्यांनी म्हटलं.

जिल्हा प्रशासनात बीडची लॉबी काम करत असल्याची माहिती पुढच्या दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यायला मला देण्यात आली आहे. बीड आपल्या राज्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे, बीड जिल्ह्याचं नाव वापरून इथे कोणी दादागिरी करत असेल तर त्यांच्यापर्यंत आम्ही पोहचू, अशा शब्दात मंत्री नितेश राणेंनी थेट इशारा दिला आहे. तसेच, काही गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत, त्या आता पत्रकार परिषदेत बोलू शकत नाही, असेही नितेश राणेंनी म्हटलं. माझ्या कृतीतून तुम्हाला यावर कसा वचक ठेवायचा हे तुम्हाला दिसेल. आम्ही मॅनेज होणाऱ्यांपैकी नाही, आम्हाला विकत घेण्याची कोणामध्ये क्षमता नाही. नियम बाह्य काम करणाऱ्या अधीकाऱ्याला घरी बसवणार, असा थेट इशारा अधिकाऱ्यांना नितेश राणे यांनी दिला आहे. जिल्ह्यात गेल्या काही वर्षे प्रशासनावर वचक नसल्यामुळे अवैध व्यवसाय सुरू झाले आहेत. त्यावर येणाऱ्या काळात कसा वचक बसवतो ते पहा. आता कणकवलीत ज्या दोन बांगलादेशी महिला पकडल्या त्या एका लॉजवर पकडल्या. मात्र, त्या रेल्वे स्टेशनला पकडले गेल्याचं दाखवल. या मागचा सूत्रधार आणि पोलीस अधिकारी यांच्यावर कारवाई केली जाणार. जिल्ह्याची प्रतिमा व भावी पीढीसोबत कोणी मस्ती करून दाखवावी, हे माझ ओपन चॅलेंज आहे, त्यांचा थेट सामना नितेश राणेंशी आहे, असा सज्जड दमच नितेश राणेंनी अधिकाऱ्यांसोबतच अवैध धंदे करणाऱ्यांना दिला.

दरम्यान, जिल्ह्यात यापुढे कोणी ड्रग्स विकायची हिंमत करत असेल तर त्याचे हात कापले जातील. जिल्ह्याच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून परजिल्ह्यातील फेरीवाले जे यु.पी. बिहारमधून येत आहेत त्यांचा येण्यामागचा हेतू काय हे यापुढच्या काळात तपासून कारवाई केली जाईल असेही नितेश राणे यांनी म्हटले आहे.

# अफवामुळे नंदुरबारमध्ये पोलिसांवर दगडफेक, संशयित १८ जण ताब्यात

दैनिक आपला विदर्भ



**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार शहरात रविवारी किरकोळ कारणामुळे निर्माण झालेल्या तणावाचा फायदा घेत एका गटातील काही जणांनी पोलिसांवर दगडफेक केली. या प्रकरणी पोलिसांनी आज १८ जणांना ताब्यात घेतले आहे. आरोपी पैकी ७ जण हे अल्पवयीन आहेत. नंदुरबार शहरातील बिस्मिल्ला चौकात रविवारी मद्यप्राशन केलेल्या रिक्षाचालकाने दुसऱ्या गटातील व्यक्तीला धडक दिली. या अपघातामुळे शहरात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर पुन्हा दोन गटांमध्ये किरकोळ घटना घडल्या. पोलिसांनी सतर्कता म्हणून चोख बंदोबस्त तैनात केला होता.

या तीनही घटनांप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवत धरपकड सुरु केली होती. परंतु रात्री १० वाजेच्या सुमारास त्रिकोणी इमारत, हलवाई मोहल्ला आणि चिराग गल्ली परिसरातील काही समाजकंटकांनी अफवां पसरवत व अंधाराचा फायदा घेत दगडफेड सुरु केली. यात बंदोबस्तासाठी उपस्थित पोलिसांवर अचानक झालेल्या दगडफेकीमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांची अतिरीक्त कुमक घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी तत्काळ कारवाई सुरु करत अश्रुधुराच्या जवळपास १२ नळकांड्या फोडत परिस्थिती नियंत्रणात आणली. याप्रकरणी पोलिसांनी १८ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दगडफेकीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एका पोलीस वाहनाचे नुकसान झाले असून बंदोबस्तावरील काही अधिकारी, कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. परिसरातील तणाव निवळण्यास सुरुवात झाली. असून पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोणीही वातावरण बिघडवण्याचे काम करू नये. ज्यांनी कायदा हातात घेवून शहराची शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला, त्यांना सोडले जाणार नाही.त्याच्यावर कडक कारवाही करण्यात येईल. शहरात शांतता आहे. कोणीही अफवेवर विश्र्वास ठेवू नये. कुठलीही अनुचित घटना दिसून आल्यास पोलिसांना तात्काळ कळवा असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवणदत्त एस यांनी सांगितले.

## जपानच्या पर्यटकांनी महाराष्ट्र राज्याला जरूर भेट द्यावी - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जपानच्या पर्यटकांनी महाराष्ट्र राज्याला जरूर भेट द्यावी. पर्यटनातून दोन्ही प्रांतातील परस्पर संबंध अधिक वृध्दिंगत होतील, असे मत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केले.

जपानच्या वाकायामा प्रांताच्या शिष्टमंडळाने पावनगड येथे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, जपानचे वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय घडामोडीचे संचालक योशीओ यामास्ताचे, जपानचे मुंबईतील महावाणिज्यदूत यागी कोजी, वाकायामाचे सोनोबे सॅन, महिरा हेदुयेकी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, अधिक्षक अभियंता शैलेंद्र बोरसे, यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित शिष्टमंडळाने पर्यटनवाढीच्या दृष्टीने देण्यात येत असलेल्या सवलती व योजनांची माहिती महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाकडून जाणून घेतली. एप्रिल महिन्यात महाबळेश्र्वर येथे होणाऱ्या पर्यटन महोत्सवास जरुर यावे, असे आग्रहाचे निमंत्रणही पर्यटनमंत्री श्री.देसाई यांनी दिले.

## जागतिक बँकेसोबतच्या कराराआधारे कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबवणार - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक बँकेसोबत झालेल्या २३००कोटी रूपयांच्या कराराच्या आधारे कौशल्य विकास विभागाच्या योजना प्रभावीपणे राबवणार आहोत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून आगामी शंभर दिवसात ५० हजार युवांना प्रशिक्षण देणार असून मुंबईबरोबरच नागपूर,पुणे,नाशिक, अमरावतीसह छत्रपती संभाजीगर येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल केंद्र कार्यरत करणार असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत करत असलेल्या कार्यवाहीची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कौशल्य विकास मंत्री श्री.लोढा म्हणाले की, कौशल्य विकास विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करणार असून, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत ५०० विविध अभ्यासक्रमांचे व्हिडीओज ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. त्याचप्रमाणे १००० शाळांमध्ये करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. जागतिक बँकेसोबत झालेल्या कराराआधारे आयटीआयची दर्जोन्नती करण्यात येणार आहे. राज्य नाविन्यता कौशल्य विकास सोसायटी मार्फत 'आयटीआय'च्या कौशल्य विकास केंद्रामार्फत १ लाख १० हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.त्याचबरोबर आयटीआय तसेच व्यवसाय शिक्षण संचालनालयाच्या परीक्षा ऑनलाईन करण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. आगामी काळात १०० रोजगार मेळावे आयोजित केले जातील.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शंभर दिवसाच्या कृती आराखड्यात विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करणे, कार्यालयातील सोयी व सुविधा वाढवणे, सुकर जीवनमान, गुंतवणूक प्रसार, जनतेच्या तक्रारींचे निवारण, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या कृती कार्यक्रमावर भर देणार असून विभागाचा कारभार अधिक गतीमान करण्यात येणार आहे. १००० विविध सामंजस्य करार करण्यात आले आहे. कौशल्य विद्यापीठात मायक्रोसॉफ्टच्या सहाय्याने आर्टिफिशियल इंटिलिजेसचे १० हजार युवांना प्रशिक्षण देणार असल्याचेही श्री.लोढा यांनी यावेळी सांगितले.

## आधार फेस ऑथेंटिकेशन व्यवहार १०० कोटींच्या टप्प्यावर; पाच महिन्यांत दुप्पट वाढ

UIDAI आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आधार संवादाचे आयोजन




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आधार'द्वारे सेवा वितरण अधिक सक्षम करण्यासाठी णखऊ-ख (युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया) आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आधार संवाद या कार्यक्रमाला इत्रङ्ख, फिनटेक आणि टेलिकॉम क्षेत्रातील ५०० हितधारक उपस्थित होते. या कार्यक्रमात आधारच्या विविध उपयोजनांवर चर्चा करण्यात आली.

फेस ऑथेंटिकेशन व्यवहारांचा ऐतिहासिक उच्चांक

आधार फेस ऑथेंटिकेशन व्यवहारांनी १०० कोटींचा टप्पा ओलांडला, केवळ पाच महिन्यांत ५० कोटींवरून दुप्पट वाढ झाली. २०२१ मध्ये सुरू झालेली ही AI/ML आधारित प्रणाली विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षित आणि सुलभ ओळख पडताळणीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे.

हितधारकांचा सहभाग : बँकिंग, एनबीएफसी, फिनटेक आणि टेलिकॉम क्षेत्रांतील तज्ज्ञांनी आधारच्या वापरासाठी चार पॅनल चर्चासत्रांमध्ये भाग घेतला. या सत्रांमध्ये आधारच्या माध्यमातून सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना व धोरणांवर विचारमंथन करण्यात आले.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील आधारची भूमिका : इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी आधारच्या लोकसंख्याशास्त्रीय वापराबद्दल सांगताना 'आधार'ने डिजिटल व्यवहारांवरील विश्र्वास वाढविण्यासाठी दिलेले योगदान अधोरेखित केले.

फेस ऑथेंटिकेशनचा वापर: आधार फेस ऑथेंटिकेशन प्रणालीला सध्या ९२ सरकारी आणि खासगी संस्था वापरत आहेत. ही प्रणाली सुरक्षित, संपर्कविहीन आणि कुठेही, कधीही वापरण्यास सोयीस्कर आहे.

भविष्यातील उद्दिष्टे

UIDAI चे सीईओ भुवनेश कुमार यांनी आधारद्वारे सेवा वितरण अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने UIDAI च्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या कार्यक्रमाने वित्त, दूरसंचार, फिनटेक आणि सार्वजनिक सेवांमध्ये आधारच्या वापराचा विस्तार करण्याचा उद्देश ठेवला आहे.

आधार संवाद कार्यक्रमाचा दुसरा टप्पा मुंबईत यशस्वीरित्या पार पडला. पहिला टप्पा नोव्हेंबरमध्ये बेंगळुरूमध्ये आयोजित करण्यात आला होता.

### मरीन ड्राइव्हच्या ट्रायडेन्ट हॉटेलमध्ये महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दक्षिण मुंबईतील प्रसिद्ध असणाऱ्या मरीन ड्राइव्हच्या ट्रायडेन्ट हॉटेलमध्ये ६० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. विनती मेहतानी असे या महिलेचे नाव असून रविवारी सदर घटना घडल्याचं समोर आली आहे. ट्रायडेन्ट हॉटेलच्या २७ व्या मजल्यावरील खोलीत विनती मेहतानी होती. हॉटेलचे कर्मचारी रुम सर्विससाठी गेल्यावर महिला दरवाजा उघडला नाही. त्यानंतर मास्टर चावीने खोलीचा दरवाजा उघडला असता विनती मेहतानी यांचा मृतदेह आढळला. सदर घटनेनंतर ट्रायडेन्ट हॉटेलने पोलिसांनी माहिती दिली.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत सातवे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** स्वातंत्र्य सेनानी गोविंदरावजी धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रत्यर्थ सातवे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले असून या कार्यक्रमाला विद्यार्थी पालक वर्ग व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहकार मंत्री यांनी यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून येणाऱ्या काळात सहकार क्षेत्रात वाढ झाली पाहिजे या दृष्टिकोनातून सर्वांनी प्रयत्न करावे व ज्या सहकारी संस्था बंद पडले आहेत ते त्वरित चालू करून गावकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा या हेतूने चालू कराव्या तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये पक्षश्रेष्ठी जे निर्णय घेतील त्यानुसार रणनीती





आखून निवडणूक लढवली जाईल व लवकरच लाडक्या बहिणीचा खात्यात २१०० रुपये जमा होतील असे पत्रकारांशी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले आहेत.

## विविध वृत्त...

### स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने केंद्र सरकारच्या निषेधार्थ लाक्षणिक उपोषण




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पंजाब हरियाणातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाला केंद्र सरकारने प्रतिसाद न दिल्याने केंद्र सरकारच्या विरोधात आज स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले आहे. यावेळी बेरोजगारीचा वाढता दर कमी करण्यासाठी शेती क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान व बाजारपेठेची स्वातंत्र्य असावे, कुठल्याही शेतकरी आंदोलनाला सरकारने कृतिशील पणे प्रतिसाद द्यावा यासह अन्य मागण्या करण्यात आल्या आहेत.

### विविध मागण्यांसाठी भूमी मुक्ती मोर्चाचे बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्यातील भूमी आणि सामाजिक न्याय हक्क आणि राज्य सरकारने वन जमिनीवरील पात्र अतिक्रमण धारकांना जमिनीचे वाटप करावे त्यांची १००% कर्जमुक्ती करावी या प्रमुख मागण्यांसाठी आज बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भूमी मुक्ती मोर्चा आणि बहुजन मुक्ती मोर्चाच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले आहे.

### जिल्हा शल्य चिकित्सक दिलीप सौंदळे यांच्या दालनात भीम ब्रिगेड संघटनेचे ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्याच्या दर्यापूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एका सहा वर्षाच्या चिमुकलीवर एका नराधमाने अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली असताना त्या चिमुकलीला अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी आणले असता तिला जवळपास एक ते दीड तास बसवून ठेवले होते. महत्त्वाचं म्हणजे त्या मुलीची अगोदरच बायपास करण्यात आली आहेत. पीडित मुलीला त्रास होत होता, नातेवाईकांनी अनेकदा डॉक्टरांना विनंती केली असून सुद्धा तिच्यावर उपचार करण्यात आले नाहीत. त्यावेळी तेथील स्टाफ भीम ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांशी उद्धटपणे वागले त्यामुळे आज या घटनेच्या निषेधार्थ भीम ब्रिगेड संघटनेच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक दिलीप सौंदळे यांच्या दालनात ठिय्या देण्यात आला व दोन्हीही कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी यावेळेस करण्यात आली.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त २७ जानेवारीला ग्रंथप्रदर्शनी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे याकरीता मराठी भाषा विभागाच्या धोरणानुसार दरवर्षी दि. १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. पंधरवडानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दि. २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथप्रदर्शनीसोबतच स्थानिक पुस्तक विक्रेते, प्रकाशक यांचेकडून बुक स्टॉल लावण्यात येणार असून त्यामुळे वाचकांना आपल्या आवडत्या ग्रंथांची खरेदी करता येणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनीला जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच ग्रंथप्रेमी व वाचकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.



# हरदडा फाटा येथील हायमास्ट दिवा बनला शोभेची वस्तू; बंद असल्यामुळे होत आहे अपघाताला कारणीभूत!

दैनिक आपला विदर्भ

■ शेख महेबुब

> हरदडा फाटा येथे केलेले राष्ट्रीय महामार्गावरील बसवलेला हाईमास्ट लैंप चालू करण्याची जबाबदारी ही संबंधित कन्स्ट्रुकशनची असते त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाची यात काही भूमिका नाही.
> **-खसावत साहेब**
> **शाखा अभियंता**
> **सार्वजनिक बांधकाम विभाग,**

**उमरखेड :** हिमायतनगर ते ढाणकी महामार्ग हा नांदेड -अर्धापूर-तमसा-हिमायतनगर-ढाणकी-फुलसावंगी -माहूर रस्त्याचा भाग आहे. या रस्त्याचे पुनर्निर्माण आणि उन्नयन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ आय हा महामार्ग करण्यात आला असून या महामार्गाचे काम रुद्र्याणी कन्स्ट्रुकशन कंपनी ने केले आहे . मात्र गेल्या काही महिन्यांपासून काम पूर्ण होऊनही या कंपनीने हिमायतनगर-ढाणकी-उमरखेड जाणारा हरदडा फाटा येथील जोड रस्त्यात्यावरील हायमास्टचे दिवे चालू नाही केल्यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्याने जाणार्या नागरिक व वाहन धारकांना याचा त्रास होत आहे.रात्रीला हरदडा फाटा येथील तीन गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर अंधार राहत असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता जास्त वाढली आहे. येथून जाताना अपघाताची भीती असल्याचे वाहन धारकाकडून बोलल्या जात आहे. हा रस्ता वर्दळीचा असून हा मार्ग महाविद्यालय, साखर कारखाना, औद्योगिक वसाहत, बँका, बाजार समिती असलेल्या अशा महत्त्वाच्या शहराला जोडत असल्याने रात्रीच्या वेळी येथे अपघात होण्याची शक्यता असते. रात्री हा महामार्ग अंधारातच असतो. वाहने चालविताना, पायी चालताना, दुचाकी, महिलांना याचा मोठा त्रास होत आहे. ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष झाले असून रात्रीच्या वेळेस अनेकदा अपघात झाले आहे. या हायमास्टचे दिवे सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या सहकार्याची आवश्यकता आहे. यातच या हायमास्ट दिव्याचे विज बिल भरणे ग्रामपंचायतीच्या आवाक्या बाहेर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेळकाढू धोरणामुळे दुतर्फा रस्ता असतांनाही पथदिवे बंद असल्याने गैरसोय होत आहे.

> हाईमास्ट लैंप चालू करण्यासाठी हरदडा ग्रामपंचायत ला सूचना केली होती व कॉन्ट्रॅक्टर ला सुद्धा यासाठी सूचना दिल्या होत्या तरी पण हाईमास्ट लैंप चालू करण्यासाठी व्यव्हार केला कॉन्ट्रॅक्टर ला सूचना देऊ.
> **-संजय दादा**
> **शाखा अभियंता राष्ट्रीय महामार्ग**



## महार चिकना फाटा येथे महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या सर्व गाड्यांना मिळाला थांबा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील महार चिकना फाटा येथे परिसरातील सोमठाणा, खापरखेड, ब्राह्मण चिकना, कोनाटी ,देऊळगाव कोळ, कारेगाव अशा बऱ्याच ठिकाणच्या प्रवाशांची छत्रपती संभाजी नगर पुणे मुंबई जालना या ठिकाणी वैद्यकीय शैक्षणिक अशा बऱ्याच कामासाठी प्रवाशांची येजा असते त्यामुळे त्या ठिकाणी मागील वर्षी मेहकर आगारांच्या सर्व बसेस ना थांबा मिळाला होता परंतु या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व आगारांच्या बस थांबल्या पाहिजे यासाठी माजी आमदार संजयजी रायमुलकर साहेब व विभागीय कार्यालय बुलढाणा येथे कार्यरत असलेले शुभम दिनकर घुगे यांच्या प्रयत्नाने महार चिकना फाटा येथे महाराष्ट्रातील सर्व बसेसना थांबा मिळाल्या असल्याचा एक परिपत्रक प्रसिद्ध झाले आहे त्यामुळे परिसरातील सर्व गावातील नागरिक माजी आमदार संजयजी रायमुलकर व शुभम दिनकर घुगे हे महारचिकना येथील भुमिपुत्र असल्यामुळे यांचे खुप कौतुक केल्या जात आहे

## ओम मुंढे राज्यात प्रथम



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद , जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सातारा व किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने १५ ते १८ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये लोणार तालुक्यातील सरस्वती विद्यालय पांग्रा डोळे येथील ई ११ वि मधील ओम गजानन मुंढे याने अमरावती विभागातून १६-१७-१८ वयोगटात -५२ किलो वजनगटातुन खेळत कोल्हापूर विभागाच्या समर्थ दिवटे या खेळाडूचा व मुंबई विभागाच्या नितेश देवकाते या खेळाडूंचा पराभव करत राज्यातून प्रथम क्रमांक मिळवला व त्याची शालेय राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली

## वेकोली सीजीएम कार्यालयासमोर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन






दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त कोळसा खाण कामगार संघटनेअंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी वेकोलि महाव्यवस्थापकांच्या कार्यालयांसमोर धरणे आंदोलन केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन आणि वैद्यकीय सुविधा अशा विविध मागण्यांवरून वाद सुरू आहेत.

या वादांचे निराकरण करण्यासाठी, कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या बीएमएस, आयटक, सीटू, एचएमएक, आणि इनटक इत्यादी संघटना व्यवस्थापनासमोर राष्ट्रीय वेतन करार, कोळसा खाण भविष्य निर्वाह निधी, सीपीआरएमएस आणि कोळसा कामगारांच्या निवृत्ती ग्रॅच्युइटीसह इतर सामाजिक सुरक्षेच्या मागण्या करतात. पण यावर फक्त चर्चा होत आहे. कोणताही उपाय निघत नाही म्हणून सेवानिवृत्त धारकांना हे धरणे देण्याची वेळ आली आहे. आमच्या मागण्या मार्च २०१८ पूर्वी निवृत्त झालेल्या पात्र कामगारांना १ जानेवारी २०१७ पासून थकबाकी देण्यात यावी, ग्रॅच्युइटीची मर्यादा २० लाख रुपये ठेवावी, वैद्यकीय कार्ड नूतनीकरणासाठी जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया सोपी करावी, जर मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करू वेळ पडल्यास कोळसा खाणीतून कोळसा बाहेर जाऊ देणार नाही असे सेवानिवृत्त कोळसा खाण कामगार संघटनाचे अखिल भारतीय उपाध्यक्ष शंभू विश्र्वकर्मा, यांनी माहिती दिली आहे.

## कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा जिल्हा दौरा

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर हे मंगळवार दि. २१ जानेवारी रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार जालना येथून दुपारी २.४५ वाजता स्वामी विवेकानंद नगर, हिवरा आश्रम ता. मेहकर जि. बुलढाणा येथे आगमन. दुपारी २:४५ ते ३:४५ वाजेपर्यंत स्वामी विवेकानंद जयंती महोत्सव निमित्त संपन्न होणाऱ्या महाप्रसाद कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३:४५ वाजता स्वामी विवेकानंद नगर, मेहकर येथून शासकीय वाहनाने खामगावकडे प्रयाण. सायंकाळी ४.३० वाजता वसुंधरा निवासस्थान खामगाव जि. बुलढाणा येथे आगमन व राखीव.

# शैक्षणिक गुणवत्ता संमेलन परिषद; शिक्षकांनी त्यागी वृत्तीने ज्ञानदान करुन विद्यार्थी घडवावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासकिय सेवेत, शिक्षण कार्यात शिक्षकांचे कर्तव्य करताना त्याला उद्योग धंदा म्हणून जीवनात स्थान देऊ नका. त्यागी वृत्तीने ज्ञानदान देऊन विद्यार्थी घडवा, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले.

बुलढाणा जिल्हा परिषद व शिक्षण विभागाच्यावतीने जिल्ह्यातील शाळा, विद्यार्थी व शैक्षणिक क्षेत्रातील संबंधीत घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा, या हेतूने शैक्षणिक गुणवत्ता संमेलनाचे आयोजन दि. १७ जानेवारी रोजी सहकार विद्या मंदिर बुलढाणा येथील सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश राठोड, शिक्षणधिकारी (प्राथमिक) जे.ओ.भटकर, अधिव्याख्याता समाधान डुकरे, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, अनिल देवकर व पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.






कार्यकमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत समाधान डुकरे यांनी अभ्यास शैलीनुसार पुस्तक निर्मीत अंतर्गत प्रेरणादायी शाळा सृजन लेखमाला, शिक्षणानंद आणि समावित शिक्षणातून दिव्यांगांचा विकास व्हावा या चार पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

तसेच शिक्षण क्षेत्राअंतर्गत जिल्हास्तरीय नवउपक्रम स्पर्धा २०२४-२५ मध्ये शिक्षकांना प्राथमिक शिक्षक गटातुन डॉ. फकिरा राजगुरु, विजय मोंढे, नागसेन साबळे, स्मिता कोल्हे, उर्मिला शेळके व उत्तेजनार्थ शेख मतिन शेख नजिर, अंजली क्षिरसागर व माध्यमिक गटातुन शदर देशपांडे, डॉ.फिरोज खान इब्राहिम खान, जनार्धन मेहेत्रे, प्रविण क्षिरसागर, सुवर्णा नंदकिशोर कुळकर्णी, उत्तेजनार्थ संजयसिंह तोमर यांना पारितोषीक वितरण करण्यात आले. जिल्हा परिषद व ओपन लिंक फाऊंडेशन यांच्यातील सामजस्य करार अंतर्गत आचार्य विनोबा भावे सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा पच्या माध्यमातुन जिल्ह्यातील उपक्रमाशिल शिक्षकांना प्रत्येक महिण्यात प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सुगम पाठशाळा अंतर्गत जिल्ह्यांतील १४ शाळेतील संगित शिक्षक, विद्यार्थी, व्यवस्थापान समितीचे अध्यक्ष व गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते हार्मोनियम आणि तबला या संगित साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब खरात यांनी तर सुत्रसंचालन अरविंद शिंगाडे व आभार प्रदर्शन अंजली नेटके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.